सुराज्य सोलापूर



# जिथं शिंदेंशिवाय सोलापूर महापालिकेत पान हलायचं नाही, तिथं प्रणिती बेदखल, संतापाचा उद्रेक दिसणार का विकास कामांत?

- ताईंच्या खदखदीच्या भावनांचा महापालिकेत बांध फुटला
- विरोधी खासदारांना बेदल करण्याच्या कारभाराचे निघाले वाभाडे
- महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सत्ताधाऱ्यांना खांद्यावरची अन् विरोधकांना पायाखालची वागणूक देण्याचा भांडाफोड
- महापालिका प्रशासनाची भविष्यातदेखील होणार मोठी कोंडी

सोलापूर/शिवाजी भोसले

**काँग्रेसच्या धडाकेबाज खासदार प्रणिती शिंदे यांनी धारण केलेलं महिषासुरमर्दिनीचं रुप महापालिकेमधील आयुक्त कार्यालयात शुक्रवार (ता.१२) पाहायला मिळालं. प्रणिती या आक्रमक होतात, मात्र त्या प्रचंड आक्रमक झालेल्या पहिल्यांदा बघायल्या मिळाल्या. वास्तविक अतिवृष्टीपेक्षा अधिक पाऊस झाल्यानं सोलापुरातील परिस्थिती भयानक बनल्याचं आणि त्याला महापालिकेचा भोंगळ कारभार जबाबदार असल्याचं नैमत्तिक कारण होतं खरं. पण ज्याप्रमाणे अतिमुसळधार पावसाचं पाणी घराघरांमध्ये शिरलं. महापालिकेच्या कारभाराविरुद्ध संतापलेल्या नागरिकांच्या भावानांचा बांध फुटला. त्याप्रमाणे खासदार प्रणितींना गृहित धरुन त्यांचे काही न ऐकता सत्ताधारी भाजपवाल्यांचे ऐकत महापालिका अधिकाऱ्यांची जी मनमानी चालली होती, त्याबद्दल प्रणितींची मनात संतापाची खदखद होती, ती खदखद बाहेर निघाली. महापालिका अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढण्याची वेळ प्रणिती शोधत होत्या आणि तो योग शहरात उद्भवलेल्या अतिवृष्टीच्या हाहाकारातून अखेर आला.**

विशेषत्वे, मागील साधारण ३-४ दशकं ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या आदेशाशिवाय महापालिकेत साधं पान हलत नव्हतं. त्याच महापालिकेत दस्तुरखुद्द खासदार असूनदेखील प्रणिती शिंदे यांना प्रत्येक आघाड्यांवर डावललं जातंय. त्यांच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या शब्दला कसलीच किंमत दिली जात नाही, प्रत्येकवेळी बेदखल केलं जातंय. बदलत्या राजकारणाचा किंबहुना सत्तेचा हा परिणाम असल्याचे जरी जाणकारांकडून म्हटलं जात असले तरी बेदखल करणं ही मोठी शोकांतिका आहे, हे मान्यच करावे लागेल, अशा प्रतिक्रिया महापालिकेत घडलेल्या गुरुवारच्या प्रकरणानंतर शहरात उमटत आहेत.

खास करुन महापालिका प्रशासनामधील वशिलेबाज अन् अड्डेलतट्टू वरिष्ट अधिकाऱ्यांकडून विरोधी काँग्रेससह अन्यजणांना बेदखल करण्याची वागणूक मिळायची, त्याबद्दल प्रणिती शिंदे यांनी संबंधितांची चांगलीच कानउघडणी केली. महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून सत्ताधाऱ्यांना खांद्यावरची अन् विरोधकांना पायाखालची वागणूक देण्याचा भांडाफोड करताना प्रणिती यांनी मुख्यत्वे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे तसेच नगरअभियंता सारिका अकुलवार यांच्यावर प्रणितींचा रोष असल्याचे लपून राहिले नाही.

सत्ताधारी आमदारांच्या तालावर महापालिका प्रशासनामधील वरिष्ट अधिकारी नाचतात. विरोधी खासदारास चक्क बेदखल करण्याचा प्रकार त्यांच्याकडून होत असल्याचे उघड झाल्यानंतर याप्रकरणाची चर्चा सोलापुरात आता रंगली असून महापालिकेचा कारभार करताना सत्ताधारी आणि विरोधक असा दूजाभाव करण्याच्या प्रकारातून महापालिका प्रशासनामधील अधिकारी सावरणार की 'जैसे थे' म्हणजे 'सत्ताधारी बोले अन् अधिकारी डोले' अशाच कारभाराचे चित्र भविष्यातदेखील दिसणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



खासदार प्रणिती शिंदे



### आता पुढे काय?

एनकॅपच्या ४० कोटींच्या निधीतून कामे करण्याची खासदार प्रणितींची यादी पूर्णपणे बाजूला केली. त्यावर प्रणिती भडकल्या. त्यांच्या संतापाचा जणू उद्रेक बाहेर निघाला. इथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची त्यांनी याप्रकरणी झाडाझडती घेतली. दरम्यान या प्रकारानंतर अधिकारी काय भूमिका घेणार? सत्ताधारी आमदारांचा काय स्टँड राहणार? प्रणितींनी सुचवलेल्या कामांच्या यादीला न्याय मिळणार का? हे सगळं पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### सत्ताधाऱ्यांच्या जीवावर अधिकाऱ्यांकडून ताई बेदखल

सत्ताधाऱ्यांचा सपोर्ट असेल तर आपल्या खुर्चीचा कसलाच धोका नाही, अशा मोठ्या अर्विभावात वागणाऱ्या महापालिका प्रशासनामधील सगळ्याच वरिष्ठ अधिकारी यांनी खासदार प्रणिती शिंदे पर्यायाने विरोधी काँग्रेससह सर्वच पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे न ऐकण्याचा पवित्रा घेतला होता. सत्ताधारी आमदारांचे 'अभय' मिळण्यातून या अधिकाऱ्यांनी खासदार असून देखील प्रणितींना बेदखल करुन टाकले.याच्या उद्रेकाचा स्फोट महापालिकेत झाला.

### जसं पेरलं तसंच उगतवय... त्यावेळी 'तसं'...अन् आता 'असं'...

महापालिकेत अनेक वर्षे सत्तेत असलेल्या काँग्रेसवाल्यांनी कारभार हाकताना प्रत्येक वेळी आणि प्रत्येक आघाड्यांवर विरोधी भाजपवाल्याना चेंगरलं.दाबलं. सूड उगवला. सत्तेच्या मस्तीत बेदखल केलं. 'किस झाड की पत्ती' याप्रमाणे वागणूक दिली. दरम्यान 'जसं पेरलं तसंच आता उगवतय'सत्तांतरानंतर भाजपवाल्यांकडून देखील 'ईट का जबाब पत्थरसे' दिला जातोय.

### ४० कोटींच्या कामांची प्रणितींची यादीच बाजूला; महपालिका अधिकाऱ्यांचं धाडस तरी किती म्हणायचं?

केंद्राच्या राष्ट्रीय स्वच्छ वायू उपक्रम म्हणजे एनकॅप या उपक्रमातून सोलापूर महापालिकेला तब्बल ४० कोटींचा निधी मंजूर झाला. या निधीतून कोणती कामे करायची? या संदर्भातील कामांची यादी खासदार प्रणिती यांनी महापालिकेला दिली होती. तथापि, ही सगळी यादी बाजूला ठेऊन महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी 'कारण-राजकारणा'च्या सत्ताधाऱ्यांच्या डावाला बळ देत सत्ताधारी आमदारांच्या याद्या कामांसाठी वापरल्या. प्रणिती च्या संपूर्ण यादीचा फळाच पुसून टाकला, त्यातून त्या आयुक्तांवर भडकल्या.

## संक्षिप्त वृत्त

### उकळते पाणी अंगावर पडल्याने तरुण भाजला

**सोलापूर :** झोपेत असताना ड्रमला पाय लागल्याने उकळते पाणी अंगावर पडल्याने तरुण भाजून जखमी झाला. ही घटना मंद्रूप तालुका दक्षिण सोलापूर येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. अंकुश नंदकुमार म्हेत्रे (वय २४ रा. मंद्रूप) असे जखमीचे नाव आहे. त्याला मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो अंथरुणात झोपला होता. त्यावेळी पाय गरम पाण्याच्या ड्रमला लागल्याने हा प्रकार घडला. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

### पिवळे विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) :** येथील नवीन विडी घरकुलात राहणाऱ्या नर्मदा गोविंद चिट्ट्याल (वय ४५) या महिलेने अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. आज शनिवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. तिला उपचारासाठी श्रीधर (मुलगा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.


### पाथरी येथे विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**पाथरी (ता.उत्तर सोलापूर) :** येथे कीटकनाशक हे विषारी द्रव प्राशन करून गणेश सदाशिव पडवळकर (वय ३६) याने आत्महत्येचा प्रयत्न केला. आज शनिवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास घरात हा प्रकार घडता. त्याला उपचाराचासाठी सारंग बंडगर (मामा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### साकत येथे घरगुती भांडणातून विष प्राशन

**साकत (ता.बार्शी) :** येथे राहणाऱ्या राणी विनोद मोरे (वय २५) या विवाहितेने घरगुती भांडणातून पिकावर फवारणीचे विषारी द्रव पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना आज शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. तिला विनोद मोरे (पती) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

### बाळे ब्रिजवर अपघात; अनोळखी व्यक्ती ठार




**सोलापूर :** पुणे महामार्गावरील बाळे ब्रिजवर अनोळखी वाहनाच्या धडकेने ४५ वर्षीय अनोळखी इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शुक्रवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडला. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून सहाय्यक फौजदार जाधव करीत आहेत.

## 'कुर्डुतील बहुचर्चित प्रकरण अद्याप धुमसतंय; अजितदादांनी मुख्यमंत्र्यांचे नाव सांगत झटकले हात

पुणे/प्रतिनिधी

**माढा तालुक्यातील कुर्डू गावातील दमबाजीचं प्रकरण अद्याप धुमसत आहे. या प्रकरणातून बेजारी होत राहिलेल्या राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शनिवार (ता.१३) या अनुषंगाने, प्रसार माध्यमांनी विचारले, तेव्हा त्यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे बोट दाखवत माध्यम प्रतिनिधींच्या प्रश्नांच्या सरबत्तीतून सुटका करुन घेतली.**

उपमुख्यमंत्री पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांना कुर्डू प्रकरणावर प्रश्न विचारला असता त्यांनी सांगितले की, 'मला जे उत्तर द्यायचं आहे ते मी दिलं आहे. तसंच ट्विट देखील केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितलं आहे की, अजित पवारांनी त्या बद्दलची जी काही भूमिका मांडायची आहे ती मांडली आहे. त्याची मुख्यमंत्र्यांनी दखल घेतली आहे.' असं स्पष्टीकरण अजितदादांनी दिलं.

### राज्यात मोठा गदारोळ, अद्याप चर्चेचं वादळ कायम



कुर्डू येथील अवैध मुरूम उपसा प्रकरणी परीविक्षाधीन अधिकारी अंजना कृष्णा यांनी कारवाई केली होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस नेत्याच्या फोनवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही कारवाई रोखण्याची सूचना संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्याला केली होती. संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्याने अजितदादांना स्वत:च्या मोबाईलवर फोन करण्यास सांगितले असता उपमुख्यमंत्र्यांनी त्यांना दमबाजी केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यावरून राज्यात मोठा गदारोळ उठला होता.अजित पवारांनी त्या प्रकरणी ट्विट करत खुलासाही केला होता. मात्र, विरोधी पक्षाने अजित पवार यांच्यावर टीका करण्याची ही संधी सोडली नव्हती. त्या प्रकरणावर पुण्यात बोलताना आज अजितदादांनी पुन्हा एकदा भाष्य केलं आहे.

## खटला मागे घेण्याच्या कारणावरुन शाळेत घुसून विद्यार्थ्यास मारहाण

सोलापूर/प्रतिनिधी



मुलाच्या वडिलांनी दाखल केलेली सावकारीची केस मागे घेत नसल्याच्या कारणावरून फिर्यादीच्या मुलाला शाळेच्या आवारात घुसून काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना आहेरवाडी (ता. दक्षिण सोलापूर) येथील कोनापुरे प्रशालेत शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली.याप्रकरणी वळसंगच्या पोलिसांनी आहेरवाडी येथील दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जखमी झालेला विद्यार्थी आहेरवाडी येथील मल्लप्पा कोनापुरे प्रशालेत शिकण्यात आहे. त्याच्या वडिलांनी गावातील एका विरुद्ध सावकाराविरुद्ध केस दाखल केली होती.

त्या कारणावरून सुरेश ब्रह्मदेव सासवे आणि प्रज्वल धोंडीबा शिंदे (दोघे रा. आहेरवाडी) हे शुक्रवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास शाळेच्या आवारात गेले आणि त्या मुलास तुझ्या वडिलांनी आमच्या मामावर केलेली सावकारीची केस मागे का घेत नाही असे म्हणत त्याला शिवीगाळ आणि धमकी देत काठीने मारहाण करून जखमी केले. अशा आशयाची फिर्याद जखमी मुलाच्या वडिलांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार चव्हाण करीत आहेत.

## बलात्काराच्या केसमध्ये गोविंदला अडकविण्याच्या दमाची कबुली; नर्तिका पूजा गायकवाडचे 'कारनामे' पोलीस तपासामधून समोर

- चतुर पूजा तपासादरम्यान लक्ष विचलित करुन फिरवत फिरव होती पोलिसांना
- 'खाकी'वर्दीचा इंगा दाखवताच पूजा झाली सुतासारखी सरळ
- तपासामधून भन्नाट माहिती समोर येण्याची उत्सुकता

सोलापूर/खास प्रतिनिधी

गोविंद बर्गे यांच्या आत्महत्याप्रकरणी संशयित आरोपी नर्तिका पूजा गायकवाड सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे. तिची कसून चौकशी सुरु आहे. चौकशीच्या टप्पावर महत्त्वाची अपडेटस् पुढे आली आहे. 'गोविंदने आपला पिच्छा पुरवू नये, प्रेमसंबंध ब्रेकअप् झाल्याचे समजावं' यासाठी नर्तिका पूजा हिने त्याला बलात्कारच्या गुन्ह्यात अडकवू, अशी धमकी दिली होती, त्याची कबूली तिने पोलिसांकडे दिली आहे. त्यातून याप्रकरणात तिच्या अडचणी वाढल्या असून पूजा हिच्या प्रेमसंबंधाच्या ब्लॅकमेलिंग प्रकरणातून गोविंद ताणतणावात होता आणि पुढे त्याने स्वत:ला कायमचे संपविण्याचा निर्णय घेतला, याबाबीस पुष्टी मिळत असल्याचे कायदेतज्ज्ञ सांगू लागले आहेत. तिच्या त्रासामधून त्याने आत्महत्या केली, ही बाब अधोरेखीत होतानाच, गोविंदच्या मृत्यूला तीच कारणीभूत ठरेल, या ठोस पुराव्याचा धागा पोलिसांच्या हाती लागल्याचे मानले जात आहे.



### नृत्यांगणा पूजाचा पोलिस कोठडीमधील मुक्काम वाढला

पोलीस कोठडी संपल्याने शनिवार (ता.१३) संशयित आरोपी पूजा गायकवाड हिला बार्शी येथील न्यायालयात हजर करण्यात आले, कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर पूजाला आणखी २ दिवसांची पोलीस कोठडी वाढवून दिली आहे. मृत गोविंद बर्गे यांनी पिस्तूल कुठून आणि कशी आणली? पूजा गायकवाड आणि गोविंद बर्गे यांच्यातील आर्थिक व्यवहारांची तपासणी करायची आहे. तसेच, वैराग येथील जो प्लॉट पूजा गायकवाडच्या नावे आहे, त्यात गोविंद बर्गे हे साक्षीदार आहेत. त्यामुळे पूजाने हा प्लॉट कसा मिळवला, ह्या सर्व बाबींचा तपास करावयाचे असल्याने पोलिसांनी पूजाच्या वाढीव कोठडीची मागणी केली होती.

### गळ्यातलं मंगळसुत्र कोणाच्या नावाचं?

एवढंच नाही तर, अनेक व्हिडीओंमध्ये पूजा हिने गळ्यात मंगळसूत्र देखील घातलं आहे. ज्यामुळे पूजा हिच्या गळातील मंगळसूत्र कोणाच्या नावाचं आहे असा प्रश्न देखील याठिकाणी उपस्थित होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी बर्गे कुटुंबियांकडून नर्तकी पूजावर विविध आरोप करण्यात आले होते.

### पूजाच्या काळजाचा 'एस' हा तुकडा कोण? खळबळजनक प्रकरणात पुन्हा मोठा ट्विस्ट

पूजा गायकवाड हिचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. ज्यामुळे पुन्हा चर्चांना उधाण आलं आहे. पूजा हिने इन्स्टाग्रामवर एक रील शेअर केली होती. ती रील पूजा तुरुंगात गेल्यानंतर चर्चेत आली आहे.इन्स्टाग्रामवर पोस्ट केलेली रील पूजा हिने 'एस' नावाच्या एक व्यक्तीसाठी केल्याचं दिसून येत आहे. पूजाने स्वतःचा एक व्हिडीओ पोस्ट करत कॅप्शनमध्ये, 'बस्स तू ही मेरा है 'एस' असं लिहिलं आहे. त्यामुळे चौकशी सुरु असताना पूजा हिच्या आयुष्यातील 'एस' कोण आहे? याची चर्चा देखील सुरु झाली आहे. पूजा हिच्या व्हिडीओवर अनेकांनी कमेंट करत संताप देखील व्यक्त केला आहे. सध्या सर्वत्र पूजा हिच्या सोशल मीडिया पोस्टची चर्चा सुरु आहे.